# सत्र खटला क्र. ०७/२०२६ वरील नि.क्र. ६३ वरील आदेश

(घोषित दि. २३/०६/२०२६ )

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपीचे वकील श्री.यु.एस.सावंत यांनी अर्जदार/आरोपी क्र.६ व्यंकटेश बाबू यांचा मुलगा विकास व्ही याचे नावे विशेष अखत्यारपत्र या दस्तऐवजावर अधीक्षक, कारागृह अधिकारी यांचे समक्ष सही घेण्यास परवारनगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, आरोपी क्र. ६ व्यंकटेश बाबू हे न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपी क्र.६ हे बेंगलोर, कर्नाटक येथील कायमस्वरुपी रहिवासी आहेत व त्याची त्या ठिकाणी जंगम मालमत्ता आहे. सदर कुटुंबाची सर्वस्वी जबाबदारी आरोपी क्र.६ याचेवर आहे. सदयस्थितीत आरोपी क्र.६ यांचा मुलगा शिक्षण घेत आहे. तसेच आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्याने बेंगलोर, कर्नाटक येथील मालमत्तेचे कोणतीही कायदेशीर व शासकीय कामे करणे अडचणीचे होत आहे. त्यामुळे आरोपी क्र.६ कडून त्याच्या मुलाला शासकीय व कायदेशीर काम करण्याकरिता अखत्यारपत्र मिळणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास आरोपी क्र.६ यांच्या कुटुंबियांचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणारे आहे. त्यामुळे अर्जदार/आरोपी क्र.६ व्यंकटेश बाबू यांचा मुलगा विकास व्ही याचे नावे विशेष अखत्यारपत्र या दस्तऐवजावर कारागृह अधिकारी यांचे समक्ष सही घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर सरकारपक्षातर्फे म्हणणे दाखल करणेत आले. त्यांच्या म्हणणे प्रमाणे दाखल केलेल्या अर्जाबाबत कायदयात कोणतीही तरतूद नाही. गुन्हा रजि.क्र. २९/२०२६ हा गुन्हा बेंगळूर, कर्नाटक येथे घडलेला असून सदर प्रकरणाची पुर्ण माहिती तेथील कोर्टात आहे याची पुर्ण कोणतीही माहिती या कोर्टात नाही. तथापि, त्या गुन्हयात सामील असलेल्या जप्त मुद्देमालाशी या कोर्टाचा संबंध राहणार नाही. त्यामुळे येथून अखत्यारपत्राची परवानगी देणे योग्य

होणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

४. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, आरोपी क्र. ६ व्यंकटेश बाबू हे न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपी क्र.६ हे बेंगलोर, कर्नाटक येथील कायमस्वरुपी रहिवासी आहेत व त्याची त्या ठिकाणी जंगम मालमत्ता आहे. सदर कुटुंबाची सर्वस्वी जबाबदारी आरोपी क्र.६ याचेवर आहे. सदयस्थितीत आरोपी क्र.६ यांचा मुलगा शिक्षण घेत आहे. तसेच आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्याने बेंगलोर, कर्नाटक येथील मालमत्तेचे कोणतीही कायदेशीर व शासकीय कामे करणे अडचणीचे होत आहे. त्यामुळे आरोपी क्र.६ कडून त्याच्या मुलाला शासकीय व कायदेशीर काम करण्याकरिता अखत्यारपत्र मिळणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास आरोपी क्र.६ यांच्या कुटुंबियांचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणारे आहे. त्यामुळे अर्जदार/आरोपी क्र.६ व्यंकटेश बाबू यांचा मुलगा विकास व्ही याचे नावे विशेष अखत्यारपत्र या दस्तऐवजावर कारागृह अधिकारी यांचे समक्ष सही घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. वरील कारणामुळे विकास व्ही यांचे नावे विशेष अखत्यारपत्र या दस्तऐवजावर कारागृह अधिकारी यांचे समक्ष सही घेण्यास परवारनगी काही अटी व शर्तीवर देणे न्यायकरिता हिताचे होणार आहे. सबब, खाली प्रमाणे आदेश करणेत येत आहे.

## – आदेश –

१. सदरचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अधीक्षक, जिल्हा कारागृह, सिंधुदुर्ग–ओरोस यांनी आपल्या समोर आरोपीची सही अर्जदार याचा मुलगा विकास व्ही यांच्या नावाने असलेल्या विशेष अखत्यारपत्रावर जर आरोपी संमत्ती देत असेल तर त्याच्या ईच्छेने सही घेण्यास

परवानगी देण्यात येते.

३. सदर अखत्यारपत्राच्या आधारे कोणत्याही अर्जाची दाखलयोग्यता (वैधता) ही संबंधित न्यायालयाच्या विवेकबुध्दीनुसार ठरवली जाईल.

४. आरोपी क्र.६ याचे मुलगा विकास व्ही यांनी या कागदपत्राच्या आधारे आरोपी क्र.६ यांचे नावे असलेली कुठलीही स्थावर व जंगम मालमत्ता विकू नये, हस्तांतर करु नये, गहाण ठेवू नये किंवा भाडेतत्वावर ठेवू नये किंवा त्रयस्थ व्यक्तीचे हक्क किंवा हितसंबंध निमार्ण करु नये.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SANTOSH TRIBHUWONNATH TRIPATHI
Date: 2026.06.23 17:42:24 +0530

दिनांक –२३/०६/२०२६ ( एस.टी.त्रिपाठी )

सिंधुदुर्ग – ओरोस. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

सिंधुदुर्ग ओरोस.